महाराष्ट्र शासन

# सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे

## नाबार्ड योजने अंतर्गत यशस्वी विकास कामे

## कान नदीवरील कुरुसवाडे – सुतारे पुल

## विकासाचा मजबुत दुवा

# -: कामाचा तपशिल :-



| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | कुरुसवाडे सुतारे आमळी रस्ता इजिमा-२४ वर सुतारे गावाजवळ कान नदीवर पुलचे बांधकाम करणे. ता. साक्री जि. धुळे |
| २ | लेखाशिर्ष | NABARD-२९ अर्थसहाय्यित |
| ३ | प्रशासकीय मान्यता | सदर कामास महाराष्ट्र शासन, सा. बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक नाबार्ड-२०२३ / सी आर-८३९९/ नि-०३ दि. २१/११/२०२३ अन्वये रु. ३२३.३८ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| ४ | तांत्रिक मान्यता | सदर कामास मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे जा. क्रं. का-२/रस्ते-३ /तांमा/अ.स.२०२३-२४/८९२/२०२४ दि. २४/०१/२०२४ अन्वये रु. २,६१,९३,५९३/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे. |
| ५ | निविदा क्रमांक व कार्यारंभ आदेश दिनांक | B-१/SE-५६/२०२३-२३ दि. १५/०३/२०२४ |
| ६ | कामाची सध्यास्थिती | काम पुर्ण. |

# -: प्रकल्पाची पार्श्वभूमी :-

- धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील कुरुसवाडे सुतारे आमळी रस्ता हा इजिमा दर्जाचा असुन त्याचा क्रमांक २४ आहे. सदर रस्ता हा पिंपळनेर राममा-७५२-जी पासुन पिंपळनेर जेबापुर दापुर धंगाई शिरसोले पचमाळ कुरुवाडे आमळी ते प्रजिमा-३४ ला मिळतो.
- सदर रस्ता हा आदिवासी व डोंगराळ क्षेत्रातुन जातो. या रस्त्यावर साखळी क्रमांक २३/५०० मध्ये कान नदी असुन सुरुवातीस सदर नदीवर जुनी तळफरशी होती. ही तळ फरशी पावसाच्या पुराने पाण्याखाली येत असल्याने वाहतूक बंद पडत होती.
- सदर रस्ता हा आमळी येथील श्री क्षेत्र कन्हैयालाल महाराज मंदिर येथे येणाऱ्या भाविकांसाठी, स्थानिक रहिवासी, शाळकरी विद्यार्थी व वयोवृद्ध नागरिकांच्या तसेच वैद्यकीय वापरासाठी महत्वाचा रस्ता आहे.

- **समस्या** :- या रस्त्यावरील कान नदीवरील अस्तित्वातील तळफरशी क्षतीग्रस्त झाल्याने स्थानिक शेतकरी भाविक, विद्यार्थी यांना ९ कि.मी. अंतर फिरुन जावे लागत होते.

# Before




# After



# -: परिणाम व लाभ :-

- सदर ठिकाणी मा.आमदार महोदया, स्थानिक जनता, लोकप्रतिनीधी यांच्या वारंवार मागणीवरुन नाबार्ड-२९ च्या RIDF (Rural Infrastructure Development Fund) योजनेंतर्गत सदर पुलाच्या बांधकामसाठी आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात येऊन सद्यस्थितीत काम पुर्ण करण्यात आलेले आहे.
- या प्रकल्पामुळे पिंपळनेर व दहिवेल येथील बाजारपेठेस जाणे सोपे व सोयीस्कर झाले.
- स्थानिक शेतकरी यांना आपली माल वाहतूक करणे सुलभ झाले.
- श्रीक्षेत्र कन्हैयालाल महाराज मंदिर, आमळी येथे पर्यटकांसाठी, शालेय विद्यार्थ्यांसाठी तसेच वैद्यकीय सोई सुविधांसाठी सदर रस्त्याचा फायदा झालेला आहे.
- परिसराच्या सामाजिक व आर्थिक विकासाला गती मिळाली.

# -: निष्कर्ष :-

- कान नदीवरील पुल हा नाबार्ड च्या ग्रामीण विकास धोरणाचा उत्कृष्ट नमुना आहे.
- या पुलामुळे सुतारे, गरताड, रोहोड, आमळी, सावरखेडा गावांचा संपर्क मजबुत झाला असुन ग्रामीण जीवनमान उंचावण्यास मोठे योगदान मिळालेले आहे.
- हा प्रकल्प इतर ग्रामीण भागांसाठी प्रेरणादायी ठरतो.

